महाराष्ट्र शासन

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http://www.dmer.org

संवैशिवसं/आस्था-३-अतांत्रिक/लघुलेखक-उ.श्रे.ता.ज्ये.-२२/ १८०७ /२०२२ दि. ०३/०२/२०२२

**परिपत्रक**

प्रति,
अधिष्ठाता/अधिक्षिका/अधिक्षक/सहयोगी प्राध्यापक/प्राचार्य

---

**विषय : उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गातील कर्मचा-यांची दि.०१.०१.२०२२ (दि.०१.०१.२०१९ ते ३१.१२.२०२१ पर्यंतच्या कालावधीमध्ये नेमणूक / पदोन्नती देण्यात आलेले) रोजीची राज्यस्तरीय तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्याबाबत...**

संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक क्र.संवैशिवसं/उच्च लघु./ज्येष्ठता सूची/४-ड/६१६५/२० दि.१५.१०.२०२०

संचालनालय व संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालये, रुग्णालये येथे कार्यरत असलेल्या, उच्चश्रेणी लघुलेखक या संवर्गातील कर्मचा-यांची दि.०१.०१.२०२० रोजीची राज्यस्तरीय तात्पुरती ज्येष्ठतासूची संचालनालयाच्या संदर्भीय दि.१५.१०.२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर ज्येष्ठतासूची अंतिम करण्यात आलेली नाही. त्यामुळे तद्नंतर नेमणूक / पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांची नावे समाविष्ट करुन दि.०१.०१.२०२२ (दि.०१.०१.२०१९ ते ३१.१२.२०२१ पर्यंतच्या कालावधीमध्ये नेमणूक / पदोन्नती देण्यात आलेले) रोजीची राज्यस्तरीय तात्पुरती ज्येष्ठतासूची या परिपत्रकान्वये प्रसिद्ध करण्यात येत असून आपल्या कार्यालयाच्या ई-मेल आय.डी.वर पाठविण्यात येत आहे. तसेच संचालनालयाच्या www.med-edu.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदर ज्येष्ठतासूची प्रसिद्ध केल्याची बाब संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी व त्याची पोच घेण्यात यावी. सदर ज्येष्ठतासूची मध्ये काही त्रुटी व दुरुस्त्या असतील तर त्याबाबत संबंधित कर्मचा-यांकडून आवश्यक त्या कागदपत्रानिशी अभिवेदन प्राप्त करुन संचालनालयास हे पत्र निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसात सादर करावी.

जे कर्मचारी रजेवर, गैरहजर असतील अशा कर्मचा-यांनाही ज्येष्ठता यादी प्रसिद्ध केल्याबाबत कळविण्यात यावे. तसेच ज्येष्ठतायादी मध्ये ज्या कर्मचा-यांची माहिती अपूर्ण आहे अशा कर्मचा-यांची माहिती भरुन ती संचालनालयास सादर करण्यात यावी.

वरिल मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत, याची स्पष्ट कल्पना संबंधित कर्मचा-यांना देण्यात यावी. सदर तात्पुरती ज्येष्ठतासूचीची प्रत एखादया कर्मचा-यास देण्यात आली नव्हती, असे जर आढळून आले तर त्याबाबत कार्यभार सांभाळणा-या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

**(डॉ.दिलीप म्हैसेकर)**
**संचालक**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**

प्रत : संचालनालयातील सर्व संबंधित कर्मचारी यांना

**उच्चश्रेणी लघुलेखक व त्या पदाच्या समतुल्य संवर्गातील S१५ : रु. ४१८००-१३२३०० या वेतनश्रेणीतील कर्मचा-यांची दि.०१.०१.२०२२ रोजीची (दि.०१.०१.२०१९ ते दि.३१.१२.२०२१ पर्यंतच्या कालावधीमध्ये नेमणूक/पदोन्नती देण्यात आलेले)तात्पुरत्या स्वरुपातील ज्येष्ठतासूची**

| ज्ये.क्र. | कर्मचा-याचे नाव | संस्था | जन्म दिनांक | नियुक्तीचा दिनांक / पदोन्नतीचा दिनांक | जात प्रवर्ग | जात वैधता | शैक्षणिक अर्हता | टंकलेखन | | लघुलेखन | | नेमणूकीचे माध्यम | स्पर्धा परीक्षेमधील गुणवत्ता क्र. / लि.टं.ज्ये.क्र | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | म | इं | म | इं | | | | |
| १ | श्रीमती चंदा बारापात्रे | इं.गा.शा.वै.म. नागपूर | २९.११.६५ | १६.०१.८४<br>०८.०३.१९ | खुला | - | बीकॉम | ४० | ५० | ८० | १२० | पदोन्नती | २<br>०१.०१.१९ | ३०.११.२३ | दि.८.३.१९ खुला प्रवर्गातून तात्पुरती पदोन्नती |
| २ | श्री.विजय बा. कुंभारकर | शा.वै.म.गोंदिया | २९.१२.६३ | ११.१०.९०<br>२९.१०.२० | इमाव | - | बी.कॉम | ४० | ५० | १२० | १२० | पदोन्नती | १२ | ३१.१२.२१ | दि.२९.१०.२० खुला प्रवर्गातून तात्पुरती पदोन्नती |
| ३ | श्री.सुनिल पांडुरंग सन्यासी | शा.वै.म.बारामती | २८.०५.६६ | ०८.०२.९१<br>२९.१०.२० | इमाव | - | बी.कॉम | ४० | ५० | १२० | १०० | पदोन्नती | १३ | ३१.०५.२४ | दि.२९.१०.२० खुला प्रवर्गातून तात्पुरती पदोन्नती |
| ४ | श्री.दिलीप शंकर मोराणकर | शा.वै.म.जळगाव | ०१.०९.६९ | ०८.०२.९१<br>२९.१०.२० | खुला | - | एचएससी | ४० | ५० | १२० | १२० | पदोन्नती | १४ | ३१.०८.२७ | दि.२९.१०.२० खुला प्रवर्गातून तात्पुरती पदोन्नती |

(डॉ.दिलीप म्हैसेकर)
संचालक
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई